ॲड. विजय भोसले यांच्या निधनाने कष्टाळू नेता गमावला: नाना पटोले

मुंबई, रत्नागिरी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. विजय भोसले यांच्या निधनाचे वृत्त अत्यंत दुःखद आणि वेदनादायी असून त्यांच्या निधनाने काँग्रेस विचारांवर निष्ठा असणारा अत्यंत मेहनती व समर्पित नेता गमावला आहे, अशा शब्दांत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी आपल्या शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

ॲड. विजय भोसले यांच्या निधनावर दुःख व्यक्त करताना प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भोसले काँग्रेस विचारांचे सच्चे पाईक होते. काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून ते सार्वजनिक जीवनात कार्यरत होते. साधी राहणी, दांडगा जनसंपर्क असणारे ॲड. विजय भोसले कायम सामान्यांच्या मदतीला धावून जात. त्यांनी आयुष्यभर कामगार आणि सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी संघर्ष केला. कोरोना महामारी आणि चक्रीवादळाच्या काळात लोकांच्या मदतीसाठी ते सतत कार्यरत होते. राजकारणासोबतच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात आणि कामगार चळवळीत त्यांनी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या निधनाने काँग्रेस पक्षाची कधीही न भरून येणारी हानी झाली आहे. ॲड. विजय भोसले यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी भोसले कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले.

आजचे भविष्य

मेष-	नवीन कामे हाती घ्याल. नातेवाईकांच्या भेटीमुळे फायदा होण्याचे योग आहेत. विचारपूर्वक कोणतेही काम करा.
वृषभ-	व्यापारात फायदा होईल. यश, मान-प्रतिष्ठा यामध्ये वाढ होईल. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील.
मिथुन-	आजचा दिवस चांगला जाणार आहे. बुद्धिचातुर्याने येणारे संकट दूर होणार आहे. प्रवासाची शक्यता.
कर्क-	दिवस चांगला जाईल. कौटुंबिक वातावरण समाधानकारक राहील. सामाजिक कार्यात सहभाग घ्याल. मन प्रसन्न राहील.
सिंह-	व्यापारात फायदा होईल. अपूर्ण राहिलेली कामे पूर्ण होतील. मित्रांचे सहकार्य लाभेल. उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका.
कन्या-	सर्व क्षेत्रात आपणास यश मिळणार आहे. नवीन संधी मिळतील. कोणाचाही राग करू नका. आरोग्य चांगले राहिल.
तूळ-	समाजात मानसन्मान मिळेल. वक्तव्यावर प्रभाव असल्याने आपली दुसऱ्यावर छाप पाडाल. रोजगारात प्रगती राहील.
वृश्चिक-	कौटुंबिक वातावरण चांगले राहील. व्यापारात नवीन सौदे आज करू नका. प्रवासात मौल्यवान वस्तुची काळजी घ्या.
धनु-	मित्रांवर अवलंबून राहू नका. प्रवास घडण्याची शक्याता आवक जावकसारखी राहिल्याने आर्थिक योग मध्यम राहील.
मकर-	नवीन प्रस्तावामुळे कामाची गती वाढणार आहे. लोकांमध्ये प्रतिष्ठा वाढणार आहे. शासकीय कामात अडचणीची शक्यता.
कुंभ-	एखादी चांगली बातमी नातेवाईकांकडून कळेल. प्रयत्नांती कामात यश मिळेल. व्यापार फायदेशीर राहील. आरोग्याची काळजी घ्या.
मीन-	मुलांच्या प्रगतीमुळे आनंदी रहाल. दिवसभरात चांगली कामे होतील. आपल्या बुद्धिचातुर्यावर समस्येचे निराकरण कराल.

शुभराशी ३ ७ ९

राजापूर तालुका माध्यमिक अद्यापक संघाच्या वतीने तालुक्यातील कोविड सेंटर तसेच आरोग्य केंद्रांना आवश्यक असलेले वैद्यकीय साहित्य तहसीलदार प्रतिभा वराळे यांच्याकडे भेट देण्यात आले.

राजापूर माध्यमिक अध्यापक संघातर्फे कोविड सेंटरला अत्यावश्यक साहित्य

राजापूर, ७ जुलै (वार्ताहर): राजापूर तालुका माध्यमिक अध्यापक संघाच्या वतीने कोविड निर्मुलनासाठी वैद्यकीय उपकरणांची मदत प्रशासनाला करण्यात आली आहे. रायपाटण येथील कोविड सेंटरला बायपंप मशीन व तालुक्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला नऊ बेडसाईड लॉकर उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

राजापूर तालुक्यातील कोविड रूग्णांकरीता कार्यरत असणा-या विविध सेंटरच्या मदतीकरीता संघाच्या वतीने शिक्षकांना सहकार्याचे आवाहन करण्यात आले होते. सामाजिक कार्यात सदैव तत्पर असलेल्या राजापूर तालुका माध्यमिक अध्यापक संघटनेच्या वतीने यातील अनेक शिक्षकांनी मदतीचा हात पुढे केला. यातून जमा झालेल्या रक्कमेतून ग्रामीण रूग्णालय रायपाटण येथील कोविड सेंटरला बायपंप मशीन व तालुक्यातील प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राला नऊ बेडसाईड लॉकर उपलब्ध करण्यात आले आहे. हे साहित्य नुकतेच तहसीलदार प्रतिभा वराळे यांच्या ताब्यात देण्यात आले.

खेडमध्ये ५२ कंटेनमेंट झोन कोरेगाव, गावडेवाडी हॉटस्पॉट

भरणे- खेड, ७ जुलै (वार्ताहर) :- खेड तालुक्यात कोरोनाचा वाढता प्रभाव असून तालुक्यातील ५२ ठिकाणी कंटेनमेंट कार्यरत करण्यात आले आहेत. त्यापैकी खाडीपट्ट्यातील कोरेगाव, गावडेवाडी येथे कोरोना रुग्णाची संख्या वाढती असल्याने हा परिसर हॉटस्पॉट म्हणून जाहीर करण्यात आली असल्याची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. कोरोनाच्या वाढत्या संख्येमुळे कार्यरत असणाऱ्या कोविड सेंटरमध्ये योग्य त्या सेवा सुविधा पुरवल्या जात आहेत मात्र वाढत्या कोरोना संख्येबरोबर बरे होण्याचे प्रमाण देखील वाढत असल्याने ही बाब दिलासा देणारी असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. दरम्यान तालुक्यातील खाडी पट्टा भागात सध्या रुग्ण वाढत आहेत. या करिता कोरेगाव, गावडेवाडी येथे १८ रुग्ण आढळून आले आहेत. त्यावर प्रशासनाची नजर असून येथील रुग्ण संख्या कमी करण्यासाठी उपाय योजना सुरू करण्यात आल्या आहेत, असे ही त्यांनी स्पष्ट केले.

चाफे येथील सुलभा जाधव यांचे दुःखद निधन

जाकादेवी, ७ जुलै (वार्ताहर) :- रत्नागिरी तालुक्यातील चाफे येथील भारतीय बौध्द महासभा गाव शाखा चाफे येथील महिला मंडळाच्या सेवाभावी ज्येष्ठ सदस्या सुलभा राजाराम जाधव (सुधाताई) यांचे वयाच्या ६२ व्या वर्षी मंगळवार दि.२९ जून रोजी दुःखद निधन झाले.

सुलभा राजाराम जाधव या अत्यंत प्रेमळ, सुस्वभावी आणि कष्टाळू होत्या. सुलभा जाधव या नातलगांसह अनेकांच्या मदतीसाठी धावून जात असत. सामाजिक व धार्मिक कामात त्यांचा नेहमीच सक्रीय पुढाकार असे. त्यांच्या पश्चात मुलगा, मुलगी, सुन, नातवंडे असा परिवार आहे. दिवंगत सुलभा जाधव यांच्या निधनाबद्दल भारतीय बौध्द महासभा गाव शाखा चाफे, विविध शाखा, तसेच चाफे- जाकादेवी सैतवडे परिसरातून तीव्र दुःख व्यक्त होत आहे.

आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त यशवंतराव देसाई यांचे निधन

हातखंबा, दि. ७ (वार्ताहर) :- हातखंबा येथील सामाजीक कार्यकर्ते तसेच आदर्श शेतकरी, गुरुवर्य अ. आ. देसाई यांचे बंधू यशवंतराव आत्माराम देसाई गुरुजी यांचे वृद्धापकाळाने व अल्पशः आजाराने दि. ६ रोजी रात्री ११ वा. त्यांच्या राहत्या घरी हातखंबा येथे वयाच्या ९२ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

स्वर्गीय यशवंतराव देसाई गुरुजी है आदर्श शिक्षक व आदर्श तालुका मास्तर म्हणून पवित्र कार्य करून सेवानिवृत्त झाले होते. हातखंबा सोसायटी व हातखंबा ग्रामपंचायत येथील सभांना उपस्थित राहून ते मार्गदर्शन ही करायचे. जिल्हा परिषदेने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन ही त्यांचा १९८० दरम्यान गौरव केला होता. हातखंबा वासिय प्रेमाने आबा म्हणून ही हाक मारायचे. मनमिळाऊ, दानशुर असे ते व्यक्तीमत्व होते.

बुधवारी स्वर्गीय यशवंतराव देसाई गुरुजी यांच्यावर शोकाकुल वातावरणात हातखंबा येथे अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी हातखंबा व पंचक्रोशीतील विविध स्तरातील मंडळी यावेळी उपस्थित होते. त्यांच्या पश्चात २ मुले, १ मुलगी सुना नातवंडे असा परिवार आहे. हातखंबा ज्युनिअर कॉलेज चे प्राध्यापक चंद्रमोहन देसाई यांचे ते वडील होत.

आयबीसी- २०१६ अंतर्गत टॅग ऑफशोअर लिमिटेड (लिक्विडेशन) मालमत्ता खरेदीच्या ई- लिलाव प्रक्रियेनुसार नोटीस

टॅग ऑफशोअर लिमिटेड (टॅग) सध्या दिवाळखोरीत असल्याने दिवाळखोरी संहिता २०१६ (आयबीसी) च्या तरतुदीनुसार लिक्वीडेशन कारवाई चालू आहे. नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल, मुंबईने दि. २६ सप्टेंबर २०२१ रोजी श्री. सुजित भट्टाचार्य यांना अवसायक (लिक्विडेटर) म्हणून नियुक्त केले आहे. ई लिलाव विक्री प्रक्रियेत भाग घेण्यास इच्छुक निविदाधारकांकडून ई- लिलाव प्रक्रियेसाठी निविदाकारांना निमंत्रित करण्याकरीता टॅग ऑफशोअर च्या मालमत्ता खरेदीसाठी नोटीस देण्यात आली आहे. आयबीसीच्या अनुषंगाने आणि ओएल प्रक्रिया दस्तऐवजाच्या अटी व शर्तीच्या आधारे मर्यादीत (लिक्वीडेशनमध्ये) 'ज्या प्रमाणे आहे तिथे', 'जे काही आहे तेच', 'जे काही आहे तेथे' ऑनलाईन नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनल मुंबईने नियुक्त केलेल्या अवसायकने (लिक्वीडेटर) स्थापन केलेल्या टॅक ऑफशोअर लिमिटेडची (लिक्वीडेशनमध्ये) भाग लिक्वीडेशन इस्पेक्ट तयार करणाऱ्या विक्रीसाठी देण्यात आलेल्या मालमत्तांच्या अधिक माहितीसाठी **www.tagoffshore.in** या साईटला भेट देता येईल.

नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्युनलने नियुक्त केलेल्या लिक्वीडेटरद्वारे स्थापन केलेल्या टॅग ऑफशोअर लिमिटेडचा भाग लिक्विडेशन इस्टेट तयार करणाऱ्या या ट्रिब्युनल २६ सप्टेंबर २०१९ रोजी दिलेल्या आदेशानुसार विक्री ई ऑप्शन प्लॅटफॉमच्या माध्यमातून होईल.

विक्री लिलावातील मालमत्तेचा तपशील

ब्लॉक १

जहाजाचे नाव	आयएमओ नं.	बांधणीचे वर्ष	जहाजाचे वर्णन	स्थळ	राखीव किंमत
टग ममता	९७७१८८०	२००५	हार्बर टॅग	जवाहरलाल नेहरु पोर्ट	२८,५७,१३,०००
टग राजवीर	९६०३५८२	२०१०	हार्बर टॅग	मुंबई पोर्ट	
टॅग लक्ष्मी	९६१९३५९	२०११	हार्बर टॅक	मुंबई पोट	
टग दहा	९४७४४७४	२०१०	अँकर हँडींग टोविंग अँड सप्लाय व्हेसल	मुंबई पोर्ट	

ब्लॉक २

जहाजाचे नाव	आयएमओ नं.	बांधणीचे वर्ष	जहाजाचे वर्णन	स्थळ	राखीव किंमत
टॅग ५	९३७८९९३	२००९	अँकर हँडींग टोविंग अँड सप्लाय व्हेसल	जयगड पोर्ट	१५,४५,६१,०००
टग सिया	९४१२२५६	२००६	हार्बर टॅग	जवाहरलाल नेहरु पोर्ट	
टग शिव	९४१२२६३	२००६	हार्बर टॅग	मार्गोवा पोर्ट	

ब्लॉक ३

जहाजाचे नाव	आयएमओ नं.	बांधणीचे वर्ष	जहाजाचे वर्णन	स्थळ	राखीव किंमत
टग १२	९६३०४५६	२०१०	अँकर हँडींग टोविंग अँड सप्लाय व्हेसल	मुंबई पी अँड व्ही	९,७४,७३,०००

ब्लॉक ४

जहाजाचे नाव	आयएमओ नं.	बांधणीचे वर्ष	जहाजाचे वर्णन	स्थळ	राखीव किंमत
टग ४	९४२८५५४	२००९	अँकर हँडींग टोविंग अँड सप्लाय व्हेसल	जयगड पोर्ट	४७,८१,६९०००
टग ८	९५४९५५४	२००९	प्लॅटफॉर्म सप्लाय व्हेसल	मार्गोवा पोर्ट	
टॅग ९	९४२८५९२	२०१०	अँकर हँडींग टोविंग अँड सप्लाय व्हेसल	मुंबई पी अँड व्ही	
टग १३	९६८०८२७	२०१४	अँकर हँडींग टोविंग अँड सप्लाय व्हेसल	मुंबई पी अँड व्ही	
टग १४	९६९८४४६	२०१४	प्लॅटफॉर्म सप्लाय व्हेसल	मुंबई पी अँड व्ही	

ब्लॉक ५

जहाजाचे नाव	आयएमओ नं.	बांधणीचे वर्ष	जहाजाचे वर्णन	स्थळ	राखीव किंमत
टग ६	९६४१७४६	२०१२	फायर फायटींग व्हेसल (एफआयएफआय॥)	मुंबई पी अँड व्ही	११,१७,८३,५००

ई लिलावासाठी अटी आणि शर्ती :-

१) ई लिलाव 'जसे आहे तेथे', 'जसे आहे तसे' **www.eauctions.co.in**

२) ई लिलावाची तारीख २७ जुलै २०२१, वेळ सायं. ३ ते ५ या वेळेत (५ मिनिटांच्या अमर्यादीत मुदतवाढीसह आणि आयएनआर १०,००,०००/- (रुपये दहा लाख) किमान वाढीव बोली

३) निविदा धारक सर्वच्या सर्व जहाजांसाठी बोली लावू शकतात. स्वतंत्र जहाजासाठी बोली लावण्यास परवानगी नाही. बोलीधारक अधिकाधिक ब्लॉकसाठी बोली लावू शकतात.

४) मालमत्ता, अर्जाच्या नमुन्याचा तपशील असलेले ई लिलाव प्रक्रिया पूर्ण दस्ताऐवज घोषणा व उपक्रम फॉर्म, सामान्य अटी व शर्ती ऑनलाईन लिलावाची विक्री **www.tagoffshore.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

५) इच्छुक निविदाधारक ईओआय अर्ज पात्रतेच्या सर्व आवश्यक कागदपत्रांसह ॲफिडेव्हीट आणि ना परताव्याच्या अनामत २००००/- (वीस हजार मात्र) सह १२ जुलै २०२१ पर्यंत जमा करु शकतील. ईओआय आणि ॲफिडेव्हीटचा तपशील फॉर्म **www.tagoffshore.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

६) बोलीधारकांनी त्यांची बोली दाखल करण्यापूर्वी स्वतंत्रपणे जहाजांचे मुल्यांकन करणे आवश्यक आहे.

७) संभाव्य निविदादारांना जहाजाच्या तपासणीसाठी साईटवर जाण्याची परवानगी दिली जाऊ शकते. त्यासाठी केवायसी, संपर्क क्रमांक, ईमेलद्वारे लिक्वीडेटरशी संपर्क साधून २२ जुलै २०२१ पर्यंत सादर करावा.

८) इच्छुक निविदादारांनी एनईएफटी/ आरटीजीएस मार्फत 'टॅग ऑफशोअर लिमिटेड' इन लिक्विडेशन खात्यात अर्नेस्ट मनी डिपॉझिट (ईएनडि) रक्कम जमा करणे आवश्यक आहे. ई लिलाव प्रक्रिया दस्तऐवजमध्ये याबाबत तपशील नमूद करण्यात आले आहे.

९) **www.tagoffshore.in** या वेबसाईटवर नमूद केलेल्या परिशिष्टानुसार इच्छुक बोलीधारकाने आयएमआर २,००,००,०००/- (२ कोटी रु.) च्या ईएनडी ठेवीचा पुरावा सादर करावा. २३ जुलै २०२१ रोजी सायं. ५.०० वा. पूर्वी दिलेल्या पत्त्यावर नोदणीकृत पोस्टाद्वारे हार्ड कॉपी पाठवावी. जेव्हा लिक्वीडेटरद्वारे मूळ प्रती मागविल्या जातील तेव्हा त्या सादर केल्या पाहिजेत.

१०) पात्र निविदा धारकांची नावे भाग घेताना उघड केली जातील. लिलावाधीन ई मेल द्वारे लिलावाची माहिती दिली जाईल. सहभागी निविदाकार ई लिलावाच्या प्रयोक्त्यात युजर आयडी द्वारे चाचणीसाठी करार करु शकतात आणि संकेत शब्द ईमेल द्वारे सूचित केले जातील.

११) जर ई लिलावाच्या समाप्तीच्या वेळच्या शेवटच्या क्षणी बोली लावली गेली तर अखेरची मुदतवाढ देऊन समाप्तीची वेळ आपोआपच निविदासाठी वाढविली जाईल. जो सर्वाधिक बोली लावेल त्याची बोली ई लिलाव प्रक्रिया बंद झाल्यावर यशस्वी म्हणून घोषित केली जाईल आणि त्या संदर्भातील माहिती इलेक्ट्रॉनिक पद्धतीने जाहीर केली जाईल.

सुदिप भट्टाचार्य
लिक्विडेटर टॅग ऑफशोअर लिमिटेड
आयबीबीआय रजि. नं. आबीबीआय/आयपीए-००३/आयपी-एन ००००८०/२०१७-१८/१०७०३
प्रक्रिया संबंधित पत्ता: द्वारा डफ अँड फेल्फस् इंडिया लि., १४ वा मजला, रहेजा टॉवर, बीकेसी, बांद्रा पूर्व, मुंबई- ४०००५१
नोंदणीकृत पत्ता: ९०३ क्वीन्सगेट सीएक्स, हिरानंदानी इस्टेट, घोडबंदर रोडच्या बाहेर, ठाणे-प. मुंबई- ४०००६०७
ई मेल पत्ता : liquidator.tagoffshore@duffandphelps.com
आयबीबीआय नोंदणीकृत ई-मेल पत्ता : resolutionsudip@gmail.com
मुंबई ८ जुलै २०२१

रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी

''सहकार भवन'', जवाहर पथ, रत्नागिरी. पिन- ४१५ ६१२.

निविदा सूचना

रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी या बँकेच्या प्रधान कार्यालयातील विभागांकरीता व तालुका क्षेत्रीय कार्यालयाकरीता Canon कंपनीचे खालील तपशिलाप्रमाणे एकूण १२ झेरॉक्स मशिन्स कार्यान्वीत करुन देणेकरीता इन्स्टॉलेशन खर्चासह अधिकृत पुरवठादारांकडून बंद निविदा मागविणेत येत आहेत.

अ.क्र.	कार्यालय	झेरॉक्स मशिनचा प्रकार व नग
१	मंडणगड	Canon iR 2206 with Platen cover and Toner (प्रत्येक तालुक्याकरिता एक याप्रमाणे एकूण - ९ मशिन)
२	दापोली	
३	खेड	
४	चिपळूण	
५	गुहागर (पाटपन्हाळे)	
६	संगमेश्वर (देवरुख)	
७	रत्नागिरी	
८	लांजा	
९	राजापूर	
१०	प्रधान कार्यालय रत्नागिरी	Canon iR 2006 N with Duplex, DADF & Toner (एकूण - ३ मशिन)

सूचना :

१. निविदा दि. १७.०७.२०२१ रोजी पर्यंत बंद लखोट्यात मा. कार्यकारी संचालक यांचे नांवे बँकेच्या प्रशासन विभाग, प्रधान कार्यालय, रत्नागिरी येथे सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारणेत येतील.

२. निविदा भरणाऱ्या एजन्सीने निविदा फी रु. ५००/- (रु. पाचशे) मात्र (विना परतावा) व अनामत रक्कम रु. ५०००/- (रु. पाच हजार) मात्र रोखीने बँकेची शाखा प्र. का. बँकींग रत्नागिरी येथे भरणा करावयाची आहे. अथवा ज्यांना आमचे बँकेत येवून सदरची रक्कम भरणा करणे शक्य होणार नाही त्यांनी फॉर्म फी व अनामत रक्कम बँकेचे IDBI बँकेतील खालील तपशिलाचे खात्यावर जमा करावी.

नांव	रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.	खाते क्र.	574102000000824
बँकेचे नाव व शाखा	आयडीबीआय बँक शाखा- शिवाजीनगर, रत्नागिरी	IFC No.	IBKL0000574

बँक खाती जमा केलेल्या अनामत रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. अनामत रक्कम व फॉर्म फी रक्कम जमा करणेत आलेल्या काऊंटर पार्टची छायांकित प्रत निविदेसोबत बंद लखोट्यावर जोडणेत यावी. बंद लखोट्यावर निविदा सूचना असे लिहावे. निविदा फी व अनामत रक्कम भरल्याशिवाय निविदा स्वीकारली जाणार नाही. ज्यांची निविदा अनामत रक्कम परत करावी लागणार आहे त्यांची निविदा अनामत रक्कम मागणीनुसार आदा करण्यात येईल.

३. कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणेचे अगर नाकारणेचे तसेच मंजूर अथवा नामंजूर करणेचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

४. अधिक तपशिलाकरीता बँकेच्या प्रशासन विभाग, प्रधान कार्यालय रत्नागिरी येथील दूरध्वनी क्र. ०२३५२-२२२६४१ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधणेत यावा.

ठिकाण - रत्नागिरी
दिनांक - ७/७/२०२१

सही/-
(श्री. सुनिल सिताराम गुरव)
कार्यकारी संचालक
रत्नागिरी जि. म. स. बँक लि. रत्नागिरी

रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी

''सहकार भवन'', जवाहर पथ, रत्नागिरी. पिन- ४१५ ६१२.

निविदा सूचना

रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. रत्नागिरी या बँकेच्या रत्नागिरी जिल्ह्यातील नऊ तालुका क्षेत्रीय कार्यालयामध्ये व्हिडीओ कॉन्फरन्सिंग सुविधा कार्यान्वीत करणेसाठी क्षेत्रीय कार्यालयांच्या क्षमतेनुसार आवश्यक कॉन्फीग्युरेशनचे एलजी कंपनीचे ०९ टी. व्ही. संच ४३'' किंवा ५६'' (with HDMI Port) कार्यान्वीत करुन देणेकरीता इंस्टॉलेशन खर्चासह अधिकृत पुरवठादारांकडून बंद निविदा मागविणेत येत आहेत.

अ.क्र.	तालुका	टि. व्ही. संच नग
१	मंडणगड	१
२	दापोली	१
३	खेड	१
४	चिपळूण	१
५	गुहागर (पाटपन्हाळे)	१
६	संगमेश्वर (देवरुख)	१
७	रत्नागिरी	१
८	लांजा	१
९	राजापूर	१

सूचना -

१. निविदा दि. १७.०७.२०२१ रोजी पर्यंत बंद लखोट्यात मा. कार्यकारी संचालक यांचे नांवे बँकेच्या प्रशासन विभाग, प्रधान कार्यालय, रत्नागिरी येथे सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारणेत येतील.

२. निविदा भरणाऱ्या एजन्सीने निविदा फी रु. ५००/- (रु. पाचशे) मात्र (विना परतावा) व अनामत रक्कम रु. ५०००/- (रु. पाच हजार) मात्र रोखीने बँकेची शाखा प्र. का. बँकींग रत्नागिरी येथे भरणा करावयाची आहे. अथवा ज्यांना आमचे बँकेत येवून सदरची रक्कम भरणा करणे शक्य होणार नाही त्यांनी फॉर्म फी व अनामत रक्कम बँकेचे IDBI बँकेतील खालील तपशिलाचे खात्यावर जमा करावी.

नांव	रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
बँकेचे नांव व शाखा	आयडीबीआय बँक शाखा- शिवाजीनगर रत्नागिरी
खाते क्र.	**574102000000824**
IFC No.	**IBKL0000574**

बँक खाती जमा केलेल्या अनामत रक्कमेवर व्याज दिले जाणार नाही. अनामत रक्कम व फॉर्म फी रक्कम जमा करणेत आलेल्या काऊंटर पार्टची छायांकीत प्रत निविदेसोबत बंद लखोट्यावर जोडणेत यावी. बंद लखोट्यावर निविदा सूचना असे लिहावे. निविदा फी व अनामत रक्कम भरल्याशिवाय निविदा स्वीकारली जाणार नाही. ज्यांची निविदा अनामत रक्कम परत करावी लागणार आहे त्यांची निविदा अनामत रक्कम मागणीनुसार आदा करण्यात येईल.

३. कोणतेही कारण न देता निविदा स्वीकारणेचे अगर नाकारणेचे तसेच मंजूर अथवा नामंजूर करणेचे अधिकार बँकेने राखून ठेवलेले आहेत.

४. अधिक तपशिलाकरीता बँकेच्या प्रशासन विभाग, प्रधान कार्यालय, रत्नागिरी येथील दूरध्वनी क्र. ०२३५२-२२२६४१ वर कार्यालयीन वेळेत संपर्क साधणेत यावा.

ठिकाण - रत्नागिरी
दिनांक - ७/७/२०२१

सही/-
(श्री. सुनिल सिताराम गुरव)
कार्यकारी संचालक
रत्नागिरी जि. म. स. बँक लि. रत्नागिरी

शब्दकोडे क्र. ६९३



आडवे शब्द- १. अठराशे सत्तावन (१८५७) च्या स्वातंत्र्यसमरास सुरुवात करणारा शूर सैनिक, ४. वारा भरण्याची पिशवी, बाणांची पिशवी, ५. आश्चर्य, ८. खिडकीची काच, ११. शत्रुत्व, हक्क, फिर्याद, १२. समुद्र, १४. विश्वासघातकी, १६. छगनह्रह्र, राष्ट्रवादी काँग्रेसचे एक नेता, १७. श्मश्रू, हजामत, १९. शहर, २१. पाणी, उदक, २३. उत्कर्ष, २६. उंटाचे पाठीवरील उंचवटा, २७. सहगमन करणारी स्त्री, २८. पांडुराजाची पत्नी, कुंतीची सवत, २९. वस्त्र, ३१. पराजय, माळ, ३३. फायदा, नफा, ३५. उत्साहभंग, हिरमोड, ३७. रीत, प्रथा, ३८. विदर्भातील एक जिल्हा, एक नदी, ३९. निरुद्योगी, ४१. एक महाकाय प्राणी, ४२. कपोल, ४३. नृत्य, ४४. पिकांच्या वाढीसाठी जमिनीत हे घालतात, ४५. स्तब्धता, न बोलणे, ४७. थप्पड, ४८. चर्चा, खल, ५०. गार, थंड, ५२. खैराचे झाड, ५३. असंपूर्ण, विव्हल, ५५. कन्या, पुत्री, ५७. अंत, शेवट, ५८. गोंधळ, घोटाळा, ६०. फुरसत, ६१. तृष्णा, ६२. उनाड, भटक्या, चटोर, थट्टेखोर, ६४. गरजू, ६५. इच्छा, आकांक्षा, ६६. जंगली, ६८. हुंडी, नाणी इत्यादींचा व्यवहार करणारा, ७०. वजन, गुरुत्व, ७१. वेळ, मृत्यू, ७२. सोडचिठ्ठी, ७६. भरपूर, विपुल, ७८. देह, शरीर, ८१. वस्त्र विणण्याचे साधन, ८३. बारीक दगड, रत्न, ८०. मूल, बाळ, ८५. आरी, लाकूड कापण्याचे अवजार, ८७. राख, भस्म, ८८. डावा, उलट, ८९. शरीर संरक्षणार्थ आड धरण्याचे हत्यार, ९०. पुढे, विरुद्ध बाजूस, ९१. निष्णात, पटाईत, ९२. स्पष्ट, शुद्ध, निर्भेळ, ९३. ढीग, चळत.

उभे शब्द- १. भगीरथी, स्वर्गातील गंगा, २. रानरेडा, ३. विष्णूचे शंखवाद्य, ४. पत्नी, ६. एक सुवासिक वृक्ष, ७. उद्यान, ८. कब्जा, अंमल, ९. अवजड, भारी, १०. नाशिवंत, १२. दुर्दैवी, १३. पती, १५. रामाचा पुत्र, १८. फेटा, २०. फळातील गाभा, २२. रसयुक्त, चटकदार, २४. वऱ्यांचे तांदुळ, २५. एक उंच वाढणारा वृक्ष, २६. प्रासाद, ३०. लहान चमचा, ३२. चुरस, अहमहमिका, ३४. निश्चित, खात्रीपूर्वक, ३५. तांबुल, ३६. सहिष्णू, सोशीक, ३७. वर्तणूक, ३८. धाक, दरारा, ४१. कबुतर, पारवा, ४३. नाखुष, ४४. उथळ पाण्याला ह्रह्रफार, ४६. पाणी, उदक, ४८. थकवा, ग्लानी, ४९. घाई, त्वरा, ५१. अल्प किंमतीचे, सवंग, ५४. नारळाची वाटी, ५५. त्वरित, सत्वर, ताबडतोब, ५६. दुःख, वेदना, ५७. निरंतर, ५९. भित्रा, ६३. बडबड्या, ६७. फायदा, लाभ, ६९. संताप, क्रोध, ७१. लबाड, कारस्थानी, ७३. समुद्र, ७४. फरक, ७५. वास्को दह्रह्र प्रसिद्ध दर्यावर्दी, ७७. घाव, इजा, ७९. मुंगुस, ८०. द्वेष, ८२. आवश्यकता, ८६. होडी, नाव, ८८. बाष्प, ८९. कोरड्या खोकल्याची उबळ, श्वासाची उबळ.

संपादक मुद्रक व प्रकाशक श्री. उल्हास शांताराम घोसाळकर यांनी हे वृत्तपत्र 'उल्हास पब्लिकेशन्स प्रा. लि.' करीता छापून प्रसिध्द केले. **प्रकाशन स्थळ :** १७७७, 'टाइम्स भवन' पो. बॉक्स नं. २२, रत्नागिरी - ४१५६१२. **मुद्रणस्थळ :** 'शालिनी प्रेस', बी-२, एम. आय. डी. सी., रत्नागिरी- ४१५६३९.
संपर्क - प्रधान कार्यालय (रत्नागिरी) - फोन - २२५०१०/११/१२ फॅक्स- २२५०१८. पुणे - फोन- २४४५५७५४, २४४५९००२. पणजी - फोन - २४३८३६६. मुंबई - फोन २४३००१९९, २४३२२६८२.
संपादकीय विभाग : व्हॉटस्ॲप क्र. ९५११८२९५३८ E Mail - timesrtn@rediffmail.com व **E Mail -** timesrtn@yahoo.co.in **जाहिरात विभाग: व्हॉटस् ॲप क्र. ८७६७३२५३०७. E-mail-** timesad888@gmail.com **रत्नागिरी आवृत्ती-** (R.N.I. Regd. No. 37534/80)